# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ९३/२०२६

**विषय :** **भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत...**

**संदर्भ :** **१)** मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन.
**२)** शासन परिपत्रक क्र. ई-१०२२४६४८, दिनांक १३ मे, २०२६
**३)** मा. प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांचे पत्र क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि-१/२०२६/ई/६८५, दि. १३ मे, २०२६

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सुचित केल्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व मा. विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग/प्रशासकीय विभाग, मा. संचालक, सर्व प्रशाला, उप-परिसर नाशिक व अहिल्यानगर, तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खालील मुद्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

१) **सार्वजनिक वाहतुकीचा वापर :** शक्य असेल तेथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.

२) **इंधन व उर्जा बचत :** पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. कार पुलिंग (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.

३) **परदेश दौरे व अनावश्यक खर्च :** सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीने किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.

४) **महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त** इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meeting) आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.

५) **स्वदेशीचा आग्रह** : भारताची आयात व वित्तीय तुट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.

६) **जीवनशैलीत बदल** : स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

७) **विजेचा अपव्यय टाळा** : कार्यालयीन कामाकरिता नैसर्गिक प्रकाशाचा वापर करून अनावश्यक विद्युत दिव्यांचा वापर टाळावा. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, संगणक, वातानुकूलीत यंत्रना, उद्वाहन इत्यादी उपकरणे बंद करावीत. तसेच, वातानुकूलीत यंत्रनेचे तापमान २४–२६ अंशावर ठेवावे.

उक्त आवाहनाची सर्व प्रशासकीय/शैक्षणिक विभाग, सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी गांभीर्याने दखल घेऊन आपल्या शैक्षणिक विभाग/महाविद्यालयांमध्ये उक्त विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना सदरील मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

गणेशखिंड, पुणे ४११००७
जा. क्र. साफुपुवि/निववि/९३८
दिनांक : १८ मे, २०२६

(प्रा. (डॉ.) प्रफुल्ल पवार)
प्रभारी कुलसचिव

**सोबत** : शासन परिपत्रक व प्र.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

१) मा. कुलगुरू यांचे स्वीय सहायक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२) मा. प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १६
३) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग
४) मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
५) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सा.फु.पु.वि. पुणे
६) मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग, सा.फु.पु.वि. पुणे
७) मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सा.फु.पु.वि. पुणे
८) मा. संचालक, सर्व प्रशाला, सा.फु.पु.वि. पुणे
९) मा. विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, सा.फु.पु.वि. पुणे
१०) मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
११) मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था
१२) सहायक कुलसचिव, उप-परिसर नाशिक व अहिल्यानगर, सा.फु.पु.वि. पुणे
१३) सहायक कुलसचिव, जनसंपर्क कार्यालय, सा.फु.पु.वि. पुणे

पश्चिम आशियाई संकटाच्या पाश्वभूमीवर
राज्य शासनाव्दारे करण्यात येणाऱ्या
उपाययोजना.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.ई-१०२२४६४८
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १३ मे, २०२६

**शासन परिपत्रक:-**

मा. पंतप्रधान महोदयांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पाश्वभूमीवर देशातील नागरिकांना आवाहन केले आहे ज्यामध्ये, घरुन काम करण्याची मुभा (Work From Home), अनावश्यक सोने खरेदी टाळणे, पेट्रोल व डिझेल चा वापर कमी करुन सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करणे, खाद्यतेलाचा वापर कमी करणे, रासायनिक खतांवरील अवलंबिता कमी करुन नैसर्गिक शेती करणे, स्वदेशी उत्पादनांचा वापर वाढविणे व परदेश दौरे टाळणे इ. बाबींचा समावेश आहे.

**या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुढील उपाय योजना प्रस्तावित केल्या आहेत:**

१. परकीय चलनाचे संवर्धन करण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी अभ्यास/शासकीय कामाकरीता मंजूर असलेल्या परदेश दौऱ़े रद्द करण्यात यावेत व नविन दौऱ्यांचे नियोजन करु नये.
२. दैनंदिन वापराकरीता बाह्यस्त्रोताव्दारे घेण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये इलेक्ट्रीक वाहने वापरण्यास प्राधान्य देण्यात यावे.
३. कार्यालयीन कामानिमित्त नियोजित स्थळभेटी दरम्यान कमीत कमी वाहनांचा वापर करावा.
४. अधिकाऱ्यांनी एकत्रित दौरा करताना carpooling व्दारे प्रवास करण्याचे नियोजन करावे.
५. अधिकारी / कर्मचारी यांनी सद्यस्थितीत कार्यालयीन कामकाजाकरीता दौरे आवश्यक असल्यास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा.
६. वरिष्ठ अधिकारी यांनी आठवड्यातील एक दिवस मेट्रोने/लोकलने/सार्वजनिक बसने प्रवास करावा.
७. इलेक्ट्रीक वाहनांची चार्जिंग यंत्रणा सक्षम करणे व त्यासाठीचे लागणारे विजेचे दर कमी करण्याबाबत विचार करावा. व चार्जिंग सेंटर उभारण्याकरीता प्रलंबित असलेल्या व नव्याने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना तातडीने मान्यता द्यावी.
८. मंत्रालयीन स्तरावरील, विभागीय स्तरावरील व जिल्हास्तरावरील शासकीय बैठका,प्रशिक्षण, सेमिनार इ. आयोजित करणे आवश्यक असल्यास VC प्रणालीचा वापर करण्यात यावा.

९. सर्व बैठका, प्रशिक्षण, चर्चासत्रे इत्यादी ऑनलाइन पद्धतीने आयोजित करावे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी याचे पालन सुनिश्चित करावे.

१०.पोलीस विभागाने कोणत्याही प्रयोजनाकरीता दुचाकी फेऱ्या (bike rallies), वाहनांच्या मिरवणूका, वाहनांचा ताफा इ. साठी परवानगी देण्यात येऊ नये.

११.माहिती व जनसंपर्क तसेच, कार्यन्वयन यंत्रणेने माफक प्रमाणात शासकीय जाहिराती प्रसारित कराव्यात आणि अनावश्यक खर्च टाळावा. खर्चिक तंत्रज्ञानाचा (डेकोरेटीव्ह लाईट्स इ.) वापर कमीत कमी करावा. फ्लेक्स, बॅनर यांचा कमीत कमी वापर करावा व प्रकाशित होर्डिंग्जसाठी डीजी सेटचा वापर करण्यात येऊ नये.

१२.कार्यालयीन कामाकरीता नैसर्गिक प्रकाशाचा वापर करुन, अनावश्यक विद्युत दिव्यांचा वापर टाळावा. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, संगणक, वातानुकूलीत यंत्रणा, उद्वाहन इ. उपकरणे बंद करावीत. तसेच, वातानुकूलीत यंत्रणेचे तापमान २४-२६ अंशावर ठेवावे.

१३."प्रधानमंत्री सुर्यघर" योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवरती सौरऊर्जा यंत्रणा बसविण्यासाठी भर देण्यात यावा.

१४.खाद्यतेलाचा वापर कमी करण्यासाठी कॅन्टीन, मध्यान्ह भोजन, अंगणवाडी, वसतिगृहे, तुरुंग, पोलीस भोजनालये, रुग्णालये यांनी त्यानुसार मेन्यूमध्ये बदल करावेत. आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका यांनी घरांना खाद्यतेलाचा वापर कमी करण्यासाठी समुपदेशन करावे. पाम/सोयाबीन/सूर्यफूल तेलाऐवजी मोहरीचे तेल, शेंगदाणा तेलाला प्रोत्साहन द्यावे.

१५.PNG चा वापर मोठ्या प्रमाणात करण्यासाठी PNG च्या जोडण्यांना प्रलंबित असलेले प्रस्ताव व नव्याने प्राप्त होणारे प्रस्तावांना तातडीने परवानगी देण्यात यावी.

१६.मुंबई आणि इतर मोठ्या शहरांमधील रेस्टॉरंट, हॉटेल्स यांनी अनिवार्यपणे पीएनजी (PNG) चा वापर करण्यासाठी प्रवृत्त करावे.

१७.प्रधानमंत्री उज्वला योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी दुबार नोंद असलेले ग्राहक शोधून त्यांची नोंदणी रद्द करण्यात यावी. तसेच, सर्वसाधारण ग्राहकांमधील बोगस, दुबार, स्थलांतरीत इ. ग्राहक शोधून त्यांची नोंदणी रद्द करण्यात यावी जेणेकरुन खऱ्याखुऱ्या ग्राहकांना योजनेचा लाभ घेता येईल.

१८. रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी, नैसर्गिक, जैविक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी, खतांच्या योग्य वापरासाठी ॲग्रीस्टॅकवर नोंदणी करण्यासाठी, युरियाचा गैर-शेती कामांसाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी, खतांचा वापर तर्कसंगत करण्यासाठी माती परिक्षण करुन पीकनिहाय आणि प्रदेशनिहाय सूचना निर्गमित करण्यासाठी कृषी विभागाकडून मोहीम राबविण्यात यावी.

१९.सर्व प्रशासकीय विभागांनी पुढील ६ महिन्यांसाठी सल्लागार यांची नेमणूक करण्याचे टाळावे.

सर्व प्रशासकीय विभाग,विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी वरील सूचनांचे योग्यरित्या पालन होईल याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक असा आहे हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJESH AGGARWAL

Digitally signed by RAJESH AGGARWAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=0F9F6000C9722E3E3367A238C3C33F8D5E290536523AEEC0B9FB859001D627C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=615B233854CCBEBA11F3E1FB5520E0111478DDF7A76032DC2D7F93E8824962C9, cn=RAJESH AGGARWAL
Date: 2026.05.13 22:06:45 +05'30'

(राजेश अग्रवाल)

मुख्य सचिव

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा. सभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा. उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६) मा. अध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
७) मा. उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८) मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
९) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
१०) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
११) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)
१५) सर्व महानगर पालिका आयुक्त / नगरपालिका मुख्याधिकारी
१६) सर्व महामंडळे / विद्यापीठे

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि-१/२०२६/ई /685 दि.१३.५.२०२६

13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. सर्व कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषयः भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत.

संदर्भः मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन.

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

1. सार्वजनिक वाहतुकीचा वापरः शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
2. इंधन व ऊर्जा बचतः पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार-पूलिंग' (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
3. परदेश दौरे व अनावश्यक खर्चः सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
4. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meetings) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.
5. स्वदेशीचा आग्रहः भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
6. जीवनशैलीत बदलः स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तरी, आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना आणि विभागांना या संदर्भात तात्काळ सूचना निर्गमित कराव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत माहितीसाठी सादरः

मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-32.

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-32.